3

दस्त क्र. २८०५ (२०१४)

# साठेखत करारनामा

साठेखत करारनामा आज तारीख १० मार्च सन २०१४ रोजी सोमवार ते दिवशी नाशिक मुक्कामी.

१) **श्री. अनिल जगन्नाथ सुर्यवंशी**
वय : ३९ वर्षे, धंदा : नोकरी
पॅन नं. : BSKPS1939M

२) **सौ. कविता अनिल सुर्यवंशी**
वय : २९ वर्षे, धंदा : व्यापार
पॅन नं. : EFJPS 9870 C
राहणार : रो. हा. नं. ९२, सरस्वती नगर,
बळी मंदीरा जवळ, रास बिहारी स्कूल जवळ,
आग्रा रोड, नाशिक, ता. व जि. नाशिक.

} **लिहून घेणार**

----यासी ----

१) **श्री. संदिप निवृत्ती हांडोरे**
वय : ३१ वर्षे, धंदा : व्यापार
पॅन नं. AEFPH2863F

२) **सौ. संगिता संदीप हांडोरे**
वय : २८ वर्षे, धंदा : व्यापार
पॅन नं.
राहणार : ७३४ बी, होली चौक, आडगांव,
ता. व जि. नाशिक.

} **लिहून देणार**

कारणे साठेखत करारनामा लिहून देणार, लिहून घेणार यांचे लाभात लिहून देतात तो ऐसे प्रमाणे

१) **मिळकतीचे वर्णन :** ता., जि. नाशिक पैकी मौजे नाशिक गावाचे शिवारातील स. नं. २३६ / १ + ३ + ४ + ५ + ६ /४अ/१/७६ यावरील ''नाशिक जिल्हा शासकीय व इतर पगारदार सेवक को. ऑप. हौ. सोसा. लि.'' पैकी **प्लॉट नं. ७६** क्षेत्र ८७ चौ. मी. याची चर्तुसिमा खालील प्रमाणे,

**प्लॉट नं. ७६ ची चर्तुसिमा**

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | प्लॉट नं. ७५ |
| पश्चिमेस | : | प्लॉट नं. ७७ |
| दक्षिणेस | : | लागू सर्व्हे नं. २३६ चा भाग |
| उत्तरेस | : | १२ मीटर रुंदीचा कॉलनी रोड |

२) **तुम्हास विक्री केलेल्या मिळकतीचे वर्णन :-** कलम १ यांतील मिळकतीवर मंजुर बिल्डींग प्लॅन प्रमाणे बांधलेल्या **''साई श्वेता रो-हाऊसेस''**, यातील रो-हाऊस

नं. २ (दोन) यांचे तळ व पहिल्या मजल्याचे बांधिव क्षेत्र ६५ चौ. मी. (कार्पेट क्षेत्र ५० चौ. मी.) व प्लॉटेड क्षेत्र ५०.४० चौ. मी. ज्यात, ३ रुम, किचन, संडास व बाथरुम यांचे वापराचे हक्कासह मिळकत ज्याची चर्तुसिमा पुढील प्रमाणे

**रो–हाऊस नं. २ ची चर्तुसिमा**

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | रो–हाऊस नं. १ |
| पश्चिमेस | : | रो–हाऊस नं. ३ |
| दक्षिणेस | : | लागू सर्व्हे नं. २३६ चा भाग |
| उत्तरेस | : | १२ मी. रुंदीचा कॉलनी रोड व मार्जिनल स्पेस |

येणे प्रमाणे चर्तुसिमापुर्वक मिळकत अंतर्गत व कॉलनी रोड वापराचे हक्कासह तसेच सोसायटी मधिल कॉमन एरीया, टेरेस व ज्या सुविधा सामाईक आहे त्या वापराचे हक्कासह व तुम्हांस विक्री केलेल्या बांधीव मिळकतीत जाण्या–येण्याच्या, हवा, पाणी, दारे, खिडक्या, गच्ची, यांचे वापराचे हक्कासह मिळकत दरोबास्त.

३) सदर दस्तामध्ये लि. देणार यांचा उल्लेख लि. देणार, लि. घेणार यांचा उल्लेख लि. घेणार तसेच कलम २ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचा उल्लेख सदरची मिळकत असा केलेला आहे.

४) कलम २ यांत वर्णन केलेली मिळकत लि. देणार यांनी श्री. अजयभाई बटूकभाई शेखालीया यांचे कडून कायम फरोक्त खरेदीखता अन्वये विकत घेतलेली असून सदर खरेदीखताचा दस्त मे. दुय्यम निबंधक साहेब नाशिक ३ यांचे कडे दस्त क्र. १८२/१३, दि. ४ / १ / २०१३ अन्वये नोंदवलेला आहे तेव्हा पासून सदर मिळकत त्यांचे खरेदी मालकीची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीत असून त्यांना सदर मिळकत विक्री करण्याचा व मोबदला स्विकारण्याचा पुर्ण हक्क व अधिकार आहे.

५) अशा प्रकारे सदर मिळकत लि. देणार यांची खरेदी मालकी हक्काची असून त्यांना ती विक्री करण्याचा व मोबदला स्विकारण्याचा पुर्ण हक्क व अधिकार आहे, त्या प्राप्त झालेल्या हक्क व अधिकारात लि. देणार हे सदरचा साठेखत करारनाम्याचा दस्त लि. घेणार यांचे लाभात लिहून, नोंदवून देत आहे.

६) **सोसायटी नोंदणी :–** कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीची मालक **"वर्षासणी को. ऑप. हौ. सोसा. ली. नाशिक"** नाशिक ही नोंदणी कृत संस्था असून तीचा नोंदणी क्र. एन. एस. के. /(एन. एस. के.)/ एच. एस. जी. (टी. सी.) ३३८१/ १९९८, दि. २०/६/१९९८ हा आहे.

७) **बांधकाम परवागनी :–** नाशिक महानगर पालीका नाशिक यांनी कलम १ यावर बांधावयाच्या इमारतीचा नकाशा मंजुर केलेला आहे व बांधकाम परवानगी पत्र क्र. :– एल. एन. डी. / बी. पी. /पंचवटी/सी–१ / ९१४ / ४७२९, दि. २७ / १२ / २०११ अन्वये दिलेली आहे.

८) **बांधकाम वापरण्याचा दाखला :–** कार्यकारी अभियंता, नाशिक महानगर पालीका नाशिक यांनी बांधकाम पुर्णत्वाचा व बांधकाम वापरण्याचा दाखला पत्र क्र. :– नगर रचना /पंचवटी/१३३१/४३८४, दि. २० / ११ / २०१२ अन्वये दिलेला आहे.

९) वर कलम २ यांत वर्णन केलेल्या मिळकत ही लि. देणार यांना अडचणीची

१) **श्री. अनिल जगन्नाथ सुर्यवंशी**
पॅन नं. : BSKPS1939M
२) **सौ. कविता अनिल सुर्यवंशी**
राहणार : रो. हा. नं. १२, सरस्वती नगर,
बळी मंदीरा जवळ, रास बिहारी स्कूल जवळ,
आग्रा रोड, नाशिक, ता. व जि. नाशिक

मा. शाखा प्रबंधक,
शामराव विठ्ठल को. ऑप. बँक ली..
पंचवटी शाखा, नाशिक

विषय :- करारनामा दस्तात दुरुस्ती बाबत

मा. महोदय,

१) **मिळकतीचे वर्णन** : ता., जि. नाशिक पैकी मौजे नाशिक गावाचे शिवारातील स. नं. २३६ / १ + ३ + ४ + ५ + ६ /४अ/१/७६ यावरील **''नाशिक जिल्हा शासकीय व इतर पगारदार सेवक को. ऑप. हौ. सोसा. लि.''** पैकी **प्लॉट नं. ७६** क्षेत्र ८७ चौ. मी. यावर बांधलेल्या **''साई श्वेता रो-हाऊसेस''**, यातील रो-हाऊस नं. **२ (दोन)** यांचे तळ व पहिल्या मजल्याचे बांधिव क्षेत्र ६५ चौ. मी. (कार्पेट क्षेत्र ५० चौ. मी.) व प्लॉटेड क्षेत्र ५०.४० चौ. मी. ज्यात, ३ रुम , किचन, संडास व बाथरुम यांचे वापराचे हक्कासह मिळकत

वरील मिळकत खरेदी घेणे कामी मी **श्री. संदिप निवृत्ती हांडोरे व सौ. संगिता संदीप हांडोरे यांचेशी करारनामा केलेला आहे तो करारनामा मे. दुय्यम निबंधक साहेब, नाशिक ५ यांचे कडे दस्त क्र. २४०५/१४, दि. ११ / ३ / २०१४ अन्वये नोंदवलेला आहे त्यात पान नं. ३ मध्ये कलम ६ व पान नं. ४ वर कलम १२ मध्ये यामध्ये सोसायटीचे नांव चुकून वर्षाराणी को. ऑप. हौ. सोसा. ली. नाशिक** हे झालेले आहे त्याऐवजी ते **नाशिक जिल्हा शासकीय व इतर पगारदार सेवक को. ऑप. हौ. सोसा. लि. नाशिक** असे पाहीजे होते परंतु सदर सोसायटीचे नांव हे कलम १ मध्ये मिळकतीच्या वर्णनामध्ये **नाशिक जिल्हा शासकीय व इतर पगारदार सेवक को. ऑप. हौ. सोसा. लि. नाशिक** असे योग्य असून तेच मुळ मिळकतीचे वर्णन आहे तसेच सोसायटीचा नोंदणीक्रमांक दस्तामध्ये योग्य व बरोबर आहे.

त्यामुळे वरील चुका हया मी अंतीम हस्तांतर दस्तामध्ये दुरुस्ती लेख करुन करुन देईल तसेच सदर सोसायटीचे मुळ शेअर सर्टीफिकेट माझे नावाने करुन आणून देईल तसेच अंतीम हस्तांतर दस्त व बँकेचे लाभात गहाणखत लिहून - नोंदवून देण्यास सोसायटीचा ना - हरकत दाखला आणून देईल

तरी माझे कर्ज प्रकरण लवकरात लवकर मंजुर करावे ही विनंती.

दि. १८ / ३ / २०१४

१) **श्री. अनिल जगन्नाथ सुर्यवंशी** ASurya

२) **सौ. कविता अनिल सुर्यवंशी** KAS

होती व तीची विक्री करावयाची होती तसेच लि. घेणार यांना नाशिक येथे त्याच परिसरात रहाण्यासाठी मिळकतीची आवश्यकता होती त्यामुळे लि. घेणार व लि. देणार यांचे दरम्यान सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीची चर्चा होऊन व्यवहार ठरला व सदर मिळकतीचा मोबदला रक्कम रुपये १४,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चौदा लाख मात्र ) ठरली आसून तो खाली तपशिलात वर्णन केल्याप्रमाणे द्यावयाचा आहे.

**१० भरण्याचा तपशिल**

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | वेळो - वेळी रोख दिले, ते पावले | ६०,०००/- |
| २ | शामराव विठ्ठल को. ऑप. बँक. ली. पंचवटी शाखा यांचा चेक नं. दि. २० / ३ / २०१४ अन्वये दिले | १,४०,०००/- |
| ३ | उर्वरीत रक्कम आज पासून १ महिन्यांचे आंत द्यावयाची आहे | १२,००,०००/- |
| | **एकूण रक्कम रुपये** | **१४,००,०००/-** |

११) वरील प्रमाणे उर्वरीत रक्कम दिल्यानंतर लि. देणार हे अंतीम खरेदीचा दस्त/ हस्तांतर दस्त लि. घेणार यांचे लाभात लिहून, नोंदवून देतील त्यात दिरंगाई करणार नाही.

१२) लि. घेणार यांना पगारदार सेवक **''वर्षाराणी को. ऑप. हौ. सोसा. ली. नाशिक''**, चे सभासद होणे मान्य व कबूल असेल तसेच सदर सोसायटीचे नियम, अटी , शर्थी लि. घेणार यांचेवर बंधनकारक असतील.

१३) लि. घेणार यांनी सदर मिळकतीचा उल्लेख फक्त रहीवासी कारणाकरीताच करावयाचा आहे, तसेच सदर मिळकतीमध्ये कायद्याने निशिध्द असे कोणतेही कृत्य करावयाचे नाही, तसेच आजू-बाजूचे इमारतीस, भिंतीस कोणत्याही प्रकारची हानी होईल असे कृत्य, बांधकाम करावयाचे नाही. सदर मिळकतीचा सुज्ञ माणसाप्रमाणे फक्त रहिवासी कारणाकरीताच उपयोग करावयाचा आहे.

१४) सदर मिळकतीचा ताबा उर्वरीत रक्कम दिल्यानंतर अंतीम खरेदीखताचे वेळेस देण्यात येईल.

१५) वर कलम २ यांत वर्णन केलेल्या मिळकतीच्या खरेदीकामी लि. घेणार यांना कोणत्याही वित्तीय संस्था, बँक वगैरे यांचे कर्ज घ्यावयाचे असल्यास त्यांनी ते कर्ज घ्यावे व सदर कर्जाकामी सदर मिळकत गहाण ठेवावी व योग्य तो गहाणखताचा दस्त त्या बँकेच्या लाभात लिहून, नोंदवून द्यावा परंतु सदर कर्ज रक्कम परस्पर लि. देणार यांना मिळाली पाहिजे व अशा प्रकारे काढलेल्या कर्जाची परतफेडीची सर्व जबाबदारी ही लि. घेणार यांचीच असेल सदर कर्जाच्या परतफेडीची कोणतीही जबाबदारी ही लि. देणार अथवा संमती

दस्त क्र.

देणार सोयायटी अथवा तीच्या इतर कोणत्याही सभासदाची नसेल.

१६) सदरची मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची असून त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोजा नाही तसेच आम्ही आजवर सदर मिळकतीबाबत कोणाशीही कोणत्याही प्रकारचा सौदा, करार, विक्री, गहाण, तारण इ. दस्त केलेला नाही.

१७) कलम १ व २ यांत वर्णन केलेली मिळकतीवर कोणत्याही न्यायालयात केस, दावा चालू नाही अथवा मनाई हुकूम नाही अथवा त्याबाबत आम्हांस आज पावेतो कोणत्याही प्रकारची नोटीस आलेली नाही.

१८) कलम १ व २ यांत वर्णन केलेली मिळकतीवर कोणत्याही प्रकारे ॲक्वीझीशन, रिक्वीझीशन नाही.

१९) सदरचा करारनामा हा उलट–पालट देणे –घेणेचा नाही,

२०) सदर करानाम्यास योग्य तो स्टॅप , टायपींग, झेरॉक्स व नोंदणी फी ही सर्व लि. घेणार यांनी त्यांच्या पदर खर्चाने लावलेला आहे तसेच अंतीम खरेदीचा सर्व खर्चही लि. घेणार हेच त्यांच्या पदरखर्चाने कराणार आहे.

२१) लि. देणार हे अंतीम खरेदीखतापर्यंतचे सर्व प्रकारचे टॅक्सेस, लाईट बील, पाणी बील, घरपट्टी, सोसायटी मेन्टेनन्स, व इतर सर्व आकार, चार्जेस पुर्ण भरुन देणार आहेत व त्यानंतरचे सर्व प्रकारचे खर्च हे लि. घेणार यांनी करावयाचे आहे

२२) सदरचा करारनामा हा लि. देणार, व लि. घेणार यांचे वाली वारस, असायनी, ॲडमिनीस्ट्रेटर यांचेवर बंधनकारक असेल.

२३) हा कररानामा लि. देणार व लि. घेणार यांनी पुर्ण होशो हवातमध्ये, कोणतीही नशा–पाणी न करता, दडपणास बळी न पडता, आनंदाने , स्वसंतोषाने, वाचून, समजून–उमजून करुन दिलेला आहे व या दस्ताच्या खाली साक्षीदारांसमक्ष सहया केलेल्या आहेत.

नाशिक, दि. १० / ३ / २०१४

१) श्री. संदिप निवृत्ती हांडोरे
लिहून देणार



२) सौ. संगिता संदीप हांडोरे
लिहून देणार





१) श्री. अनिल जगन्नाथ सुर्यवंशी
लिहून घेणार



२) सौ. कविता अनिल सुर्यवंशी
लिहून घेणार

साक्षीदार

१) अशोक गगन सुर्यवंशी

२) रघुनाथराव धर्मा सुर्यवंशी

## नाशिक महानगरपालिका, नाशिक

इमारत बांधकामाचा वापर करणे बाबतचा दाखला

(पूर्ण/अंशत:)

जावक क्र./मवि/पंचवटी/13313/4354

दिनांक २० /११/२०१२

13313

नाशिक जिल्हा शासकिय वरतर प्रभारदार सेवक को. ऑप. हौसिंग संस्था मर्या. नाशिक सभासद- अजयभाई बदकभाई शेरवालिया,

संदर्भ : तुमचा दिनांक 3 /१०/२०१२ चा अर्ज क्रमांक सि-१/४०८७

दाखला देण्यात येतो की नाशिक शिवारातील / सि.स.नं., स. नं. २३६/१+३+४+५+६/४अ/१/७६

प्लॉट नं. ६ — मधील इमारतीच्या तळ + पहिला मजला फक्त

बांधकाम परवानगी क्र. सि-१/३१४/४८२९ दिनांक २८/१२/२०११ अन्वये

आर्कि./इंजि./ सुपरवायझर, श्री. व्हि.बी. शार्दुल, स्ट्र.इं. आर.एन.सिंग,

यांच्या देखरेखीखाली पूर्ण झाली असून निवासी / ~~बिगरनिवासी~~ / ~~औद्योगिक~~ कारणासाठी खालील अटी शर्तीस अधिन राहून

वापरण्यास परवानगी देण्यात येत आहे.

क्षेत्र ... १७८.२८ चौ.मी. — चौ.मी.

... १७४.८३ चौ.मी. — चौ.मी.

वापर निवासी/~~बिगरनिवासी~~/~~औद्योगिक~~ कारणाकरिताच करता येईल. त्या वापरात बदल करता येणार नाही. बदल करावयाचा झाल्यास इकडील कार्यालयाची पूर्व परवानगी घ्यावी लागेल.

घरपट्टीसाठी आकारणी प्रत अधिक्षक (कर) घरपट्टी विभाग यांचेकडे पाठविण्यात आली आहे. तरी घरपट्टी बाबत त्यांचेकडे त्वरीत संपर्क साधावा.

पाणी पुरवठा करणेस हरकत नाही.

सदरच्या इमारतीत म.न.पा.च्या पूर्व परवानगी शिवाय वापरामध्ये व बांधकामामध्ये कोणताही बदल करू नये.

कंम्प्लेशन तडजोड फी र.रु. २३५५/- पा.क्र. ३३/६३३३ दि. /१०/२०१२ अन्वये भरलेले आहेत.

उप अभियंता
कार्यकारी अभियंता
नगररचना विभाग
नाशिक महानगरपालिका, नाशिक

दस्त क्र. २४०८/२०१४

१३ — १५

---

गाव नमुना नऊ

दैनिक पावती पुस्तक

R. V. 19 m.

२३६/१+३+४+५+६/४अ/१/७६

1898912

महाराष्ट्र शासन ( रोजकीर्द व पावती पुस्तक )

गाव— नाशिक तालुका नाशिक खाते क्र.

दिनांक ५/९/१२ भोगवटादार/पैसे देणारा गजानन पांडुरंग शिंदे

एकत्रीकृत जमीन महसूल